Chairman
Vidyadhar Anaskar
M.Com., D.T.L., D.L.L. & L.W., LL.B.
Vice Chairman
Ramakant Khetan
B.Sc., LL.B.
Chief Executive & Secretary
Sayali Bhoir
B.Com., G.D.C. & A., LL.B., C.A.I.I.B
MBA (Banking & Finance)

**The Maharashtra Urban Co-op. Banks' Federation Ltd.**
(Regd. No. BOM-GNL-8 of 9th March 1979)
Bharatiya Krida Mandir, 4th Floor,
Wadala, Mumbai - 400 031. P. B. No. 7120,
Tel. : 022 - 2413 5797, Fax : 022 - 2415 1185
E-mail : admin@mucbf.com ● www.mucbf.com

परिपत्रकःएमयुसीबीएफ/40/5/2018-19
दि. 16 एप्रिल, 2018

प्रति,
**मा.अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी**
सर्व नागरी सहकारी बँका व
बँकांची जिल्हा/विभागीय असोसिएशन्स

विषयः नागरी सहकारी बँकांच्या एकरकमी कर्ज परतफेड योजना अंतर्गत वसुलीबाबत माहीती.

**महोदय/महोदया,**

वरील विषयानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने शासन निर्णय क्रमांकःयुआरबी-1807/प्र.क्र.459(ब)/7-स, दि.15 नोव्हेंबर,2017 रोजीच्या आदेशानुसार राज्यातील सर्व नागरी सहकारी बँकांना एकरकमी कर्ज परतफेड योजना लागू केली होती. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांना सदर योजनेची प्रगती व फलनिष्पत्तीबाबतचा आढावा घेऊन त्यानुषंगाने शासनास अहवाल सादर करावयाचा आहे.

आपल्या बँकेने एकरकमी कर्ज परतफेड योजना स्वीकारली असल्यास सदर योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या कर्जदारांच्या खात्यांची माहिति प्रपत्रात भरुन अथवा सदर योजना स्वीकारली नसल्यास त्याबाबतचे संयुक्तीक कारण सोबतच्या प्रपत्रात नमूद करुन सदर योजनेची माहिती फेडरेशनच्या कार्यालयास त्वरीत पाठवावी, जेणेकरुन सदरची माहिती मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या कार्यालयास पाठविणे सोईचे होईल. सोबत प्रपत्राची प्रत आपल्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठवित आहोत.

कळावे.

आपली विश्वासू

**सौ.सायली भोईर**
मुख्य कार्यकारी व सचिव

सोबतः वरीलप्रमाणे.